# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : २८/०२/२०२४

# प्रेसनोट

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचेमार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत "चला जाणुया नदीला" या अभियानाद्वारे पाण्याची उपलब्धता व पाणी वापराचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचा गरजेपुरता वापर करणे, नैसर्गिक जलस्त्रोत, नदया व जलाशयाचे प्रदुषण रोखणे, पायाभुत सुविधांचे संरक्षण करणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांचे पालन करणे, याबाबत समाजात जागृती व साक्षरता निर्माण होण्यासाठी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, उप-आयुक्त डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन महापालिका मुख्यालयातील महासभा सभागहात करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेचे आयोजन पर्यावरण विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत व त्यांचे सहकारी यांचेमार्फत करण्यात आले असुन यामध्ये उल्हासनगर शहरातील खाजगी व महापालिकेच्या शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये जलप्रदुषण रोखणे तसेच जलाशयांचे संरक्षण करणे इत्यादी बाबींवर जागरुकता निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे ठाणे जिल्हा नदी संवर्धन समितीवर नियुक्त अशासकिय संस्था तथा जलनायक तथा समन्वयक, उल्हासनगर, डॉ. स्नेहल दोंदे यांनी उपस्थितांना मागदर्शन केले.

सदर कार्यशाळेमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेचे कार्यकारी तसेच श्री. वैभव वाळींबे, वन परिमंडळ अधिकारी, वन विभाग, अंबरनाथ, एमआयडीसी अंबरनाथ, जलप्रहरी, उल्हासनगर हेदेखील उपस्थित होते.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनॅलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.